# चाऱ्यासाठी मका पिकाची लागवड

प्रा. आशिष सहाणे
सहाय्यक प्राध्यापक

प्रा. प्रणिता सहाणे
सहाय्यक प्राध्यापिका

कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, गुंजाळवाडी पठार, संगमनेर

मका हे जगाच्या अर्थव्यवस्थेमध्ये जनावरांसाठी चारा म्हणून महत्त्वाचे तृणधान्याचे पीक होय. जगात तृणधान्य पिकांच्या उत्पादनामध्ये गहु व भात या पिकानंतर मक्याचा क्रमांक लागतो. उपलब्ध तृणधान्य पिकांच्या तुलनेत विक्रमी उत्पादन देण्याची क्षमता मका ह्या पिकात आहे. म्हणूनच मका या पिकास तृणधान्य पिकांची राणी असे म्हणतात. मका पिकाचा चारा अत्यंत सकस, रुचकर असतो. मका पिकाचा हिरवा चारा दुभत्या जनावरांना खाऊ घातल्याने दुधाचे प्रमाण वाढते. मध्यम ते भारी परंतु चांगला निचरा होणाऱ्या जमिनीत महिना अखेरपर्यंत या पिकाची लागवड पूर्ण करावी. मका हिरवा चारा व मुरघास म्हणून वापरता येतो. त्याच्यापासून अधिकाधिक चारा मिळण्यासाठी खालीलप्रमाणे तंत्रज्ञानाचा अवलंब करावा.



### जमीन:

मध्यम ते भारी, चांगला निचरा होणारी जमीन आवश्यक असते. काळी कसदार, गाळाची व नदीकाठची जमीन अत्यंत उपयुक्त असते.

### मशागत:

पेरणीपूर्वी एक नांगरट, दोन कुळवाच्या पाळ्या देऊन जमीन भुसभुशीत करावी. लागवडीसाठी सपाट वाफे अथवा सऱ्या सोडाव्यात. त्यामुळे पिकाची वाढ चांगली होते.

### पेरणी:

चारा पीक म्हणून खरीप हंगामध्ये जुन- जुलै, रब्बी हंगामात ऑक्टोंबर-नोव्हेंबर आणि उन्हाळी हंगामात फेब्रुवारी- मार्च महिनात पेरणी करावी. पेरणी ३० सेंमी अंतरावर करावी.

### बियाणे प्रमाण व बीजप्रक्रिया:

पेरणीसाठी प्रति हेक्टरी ७५ किलो बियाणे वापरावे. पेरणीपूर्व बीजप्रक्रियेसाठी ॲझोटोबॅक्टर जीवाणू संवर्धक २५० ग्रॅम प्रति १० किलो बियाण्यास चोळावे.

### सुधारित जाती:

आफ्रिकन टॉल, मांजरी कंपोझीट, विजय, गंगा, सफेद-२, गंगा सफेद-५, डेक्कन डबल हायब्रीड

### आंतरमशागत:

पेरणीपासून महिनाभर पीक तण विरहित ठेवावे. त्यासाठी आवश्यकतेनुसार एक-दोन वेळा खुरपणी करून पीक स्वच्छ ठेवावे. एक महिन्यानंतर कोळपणी करावी. त्यामुळे तण नियंत्रणही होते तसेच मुळांना हवा मिळून पिकाची वाढही होते.

### खत व्यवस्थापन:

पूर्वमशागत करताना प्रति एकरी साधारणपणे १.२ टन (४-५ बैलगाड्या) चांगले कुजलेले शेणखत जमिनीत मिसळावे. प्रति एकरी नत्र ४० किलो, स्फुरद २० किलो व पालाश २० किलो अशी खत मात्रा आवश्यक आहे. पेरणीवेळी नत्र २० किलो, स्फुरद २० किलो व पालाश २० किलो द्यावे. नत्राची उर्वरित मात्रा २० किलो पेरणीनंतर ३० दिवसांनी द्यावी.

### पाणी व्यवस्थापन:

खरीपात १५ दिवसांनी, रब्बी हंगामात १० ते १२ दिवसांनी व उन्हाळी हंगामात ७ ते १० दिवसांनी अंतराने पाणी द्यावे.

### पीक संरक्षण:

#### खोड किडा:

फवारणी प्रति लिटर पाणी प्रोफेनोफॉस (५० ईसी) १.४ मि.लि. दुसरी फवारणी १०-१५ दिवसांनी करावी.

#### मावा:

फवारणी प्रति लिटर पाणी निंबोळी अर्क ५ टक्के किंवा ॲझाडिरॅक्टीन (१०,००० पीपीएम) २ मि.लि.

### कापणी:

हिरव्या व सकस चाऱ्यासाठी मक्याचे पीक ५० टक्के फुलोऱ्यात आल्यावर म्हणजे पेरणीनंतर अंदाजे ६५ ते ७० दिवसांनी कापणी करावी. अनेक शेतकरी मका पूर्ण पक्व झाल्यावर जनावरांना खाऊ घालतात. त्याऐवजी ५० टक्के पीक फुलोऱ्यात असताना जनावरांना चारा द्यावा. या वेळी चारा अधिक सकस असतो.

### फुलोऱ्यातील मका पिकातील अन्नघटक:

प्रथिने : ५ टक्के
स्निग्ध पदार्थ : ४.२ टक्के
खनिजे : ६ टक्के
पिष्टमय पदार्थ : ५२.८ टक्के

(संपर्क: +९१ ७९७२७५६९०२)

★ ★ ★